अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# मोदी उवाच, मी तर ब्रह्मचारी! मी कसा भ्रष्टाचारी

महाभारतात युधिष्ठिर हे एक पात्र आहे. धर्माने, नीतीने वागणारा म्हणून त्याला धर्मराज म्हटले गेले. आपणच स्वत:चा मानदंड निर्माण करणारा युधिष्ठिर तसा सामान्य स्वरुपाचाच. युधिष्ठिराच्या बाबतीत एक गोष्ट वारंवार झालेली दिसून येते, ती म्हणजे त्याने पाहिलेले स्वप्न आणि नियती यांची कधी गाठभेट झालीच नाही. एकीकडे नीती, नियती तर दुसरीकडे मानदंडांची आत्मवंचना! एकीकडे भाषा करायची धर्माची, सभ्यतेची तर दुसरीकडे द्यूतासारख्या डावपेचालाही बळी पडायचे. असा प्रकार महाभारतापासून भारतात नेहमीच चालत आला. द्यूत किंवा जुगार हा सामर्थ्यासाठी कधीच नसतो तो सत्तेची नशा उपभोगण्यासाठीच खेळला जातो. तसा आताच्या राजकारणातही खेळला जातो. त्याचा नव्या काळातला नवा खेळ नरेंद्र मोदीही खेळत आहेत. त्यांच्या एकूण बोलण्यातून त्यांना सभ्यता आणि भ्रष्टाचार नसलेले राज्य आणायचे आहे. त्यांना आधुनिक राजधर्माचा नवा मानदंड निर्माण करायचा आहे. हे शक्य करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग ते करीत आहेत. नवनवे उपाय, मार्ग शोधत आहेत. जनमानसामध्ये आपली प्रतिमा ठसविताना आपण कसे एका वेगळ्या राजधर्मासाठी लायक किंवा पात्र आहोत हे सांगण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अशा त्यांच्या खटपटी आणि लटपटीतला ताजा प्रकार म्हणजे त्यांनी एक काहीसे अनपेक्षित विधान केले. आपण ब्रह्मचारी आहोत, आपल्या मागे कोणताच कुटुंब कबिला नाही, मग आपण कोणासाठी पैसे जमविण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. आपण संसारी नसल्याने भ्रष्टाचार करण्याची गरजच नाही, असा नवा युक्तिवाद मांडून त्यांनी चर्चेला मुद्दा सोडून दिला. याचा दुसरा अर्थ म्हणजे, राजकारणात किंवा सत्तेत ब्रह्मचाऱ्यांनी आले पाहिजे म्हणजे मग भ्रष्टाचार होणारच नाही आणि संसारी माणूस सत्तेत आला म्हणजे तो भ्रष्टाचार करेलच असा हास्यास्पद मुद्दा त्यांनी मांडला आहे. अर्थात प्रपंच, मुलं-बाळ,  बायको, संसार असलेल्या माणसाला अनेक गोष्टींची आसक्ती असते. तो अधिकाधिक माया संपत्ती गोळा करण्याचा प्रयत्न करतो. केवळ आपल्या मुला-बाळांचेच नाही तर आपल्या काही पिढ्यांचे कल्याण होईल इतकी संपत्ती गोळा करण्याचा मोह त्याला होत असतो. परंतु नरेंद्र मोदी यांचे हे म्हणणे स्वत:चे महत्त्व वाढविण्यासाठी आहे. स्वत:ला ब्रह्मचारी म्हणवून आपण इतरांपेक्षा अधिक नि:स्वार्थीपणे राज्यकारभार करू शकतो, हे त्यांना जनतेच्या मनावर बिंबवायचे आहे.

### ब्रह्मचारी आणि सत्तासुंदरी

शेवटी मोदी ज्या काळात वावरतात, ते पाहिल्यावर ते भलेही ब्रह्मचारी असले तरी आसक्तीपासून दूर राहू शकत नाहीत. ते भलेही संसारी नसले तरी सत्तासुंदरीपासून विभक्त होऊ शकत नाहीत. आपण ब्रह्मचारी असल्याने भ्रष्टाचार करण्याचा मुद्दाच उपस्थित होत नाही हे त्यांचे म्हणणे घटकाभर खरे मानले तरी भ्रष्टाचार हा फक्त कुटुंब कबिल्यांसाठीच केला जातो असे नाही. आज भ्रष्टाचार म्हणजे केवळ पैसा गोळा करणे असे नाही. तर आपण भूषवित असलेल्या पदाचा कोणत्याही पध्दतीने गैरवापर करणे हासुध्दा भ्रष्टाचारच ठरत असतो. महाभारतात युधिष्ठिराने स्वत:ला कितीही सत्यवादी आणि सभ्य म्हणून सादर करण्याचा प्रयत्न केला असला, तरी तो द्यूत खेळला आणि ती एकच चूक जवळपास सगळ्या महाभारताला कारणीभूत ठरली किंवा युधिष्ठिरासारखा धर्मवादीसुध्दा द्यूत खेळण्यापासून स्वत:ला रोखू शकला नाही. सध्याच्या आधुनिक राजकीय महाभारतात अशा सत्तापटाचा जोरदार खेळ सुरू आहे. नरेंद्र मोदी स्वत:ला सत्तेच्या द्यूतापासून रोखू शकत नाहीत. भ्रष्टाचाराचाच विचार केला तर सत्तेच्या आसक्तीत अडकणे हादेखील त्याचाच एक भाग ठरू शकतो. परंतु तो सध्याच्या राजकारणाचा भाग मानला आणि बोलून चालून ते राजकारणी असल्याने त्यांना हा सत्ताद्यूत खेळणे क्रमप्राप्त ठरते. परंतु सत्तेत असताना त्यांनी स्वत:साठी जरी पैसे गोळा केले नाहीत आणि पक्षासाठी निधी जमवला तरी तो एक भ्रष्टाचार असतो. विशेष म्हणजे हा पैसा रोख स्वरूपात गोळा होतो. त्याचा हिशेब ठेवला जातोच असे नाही. कोणत्याही राजकीय पक्षाला देणग्या हव्याच असतात. परंतु या घेतांना चेकने न घेता रोखीने घेण्याचा प्रकार हासुध्दा गैरव्यवहारच म्हणायला हवा. म्हणजेच आपण ब्रह्मचारी आहोत आपल्याला पैसा गोळाच करावा लागत नाही आणि म्हणून भ्रष्टाचार करण्याचे आपल्याला कारणच उरत नाही असा तर्क मोदी मांडतात, तो यामुळे हास्यास्पद ठरतो.

### चाय पे चर्चा, किसने किया खर्चा

भारतामध्ये आज एकही राजकीय पक्ष किंवा नेता हा धुतल्या तांदळासारखा नाही. त्याला आपली निवडणूक पध्दतीही कारणीभूत आहे. निवडणुका हा समाजकारणाचा भाग न राहता सत्ता प्राप्त करण्यासाठीचे एकमेव माध्यम आहे. आणि मग ही सत्ता मिळविण्याकरीता वाट्टेल तसा पैसा खर्च केला जातो. प्रत्येक राजकीय पक्षाचे कार्यालय एखाद्या कॉर्पोरेट ऑफिससारखे सजवलेले असते. एखादी कंपनी आपले प्रॉडक्ट विकण्याकरिता जाहिरातबाजी करते तशी जाहिरातबाजी राजकीय पक्षही करतात. मोदींचा पक्ष लोकसभा निवडणुकीतल्या जाहिरातीसाठी तब्बल चारशे कोटी रुपये खर्च करणार आहे. सर्व पक्षांचे मोठे मोठे मेळावे, जंगी जाहीर सभा होतात. त्यासाठी पैसा येतो कुठून? हा सगळा असाच कामाच्या मोबदल्यात घेतलेला पैसा असतो. त्याला भ्रष्टाचार म्हणायचे नाही तर काय शिष्टाचार म्हणायचे का? नरेंद्र मोदी तर आपली प्रतिमा निर्माण करण्याकरिता हायटेक प्रचार करीत आहेत. नुकताच त्यांचा 'चाय पे चर्चा' या नावाचा कार्यक्रम देशभर एकाचवेळी  झाला. या एकाच कार्यक्रमाचा खर्च म्हणे २ ते ३ कोटी रुपये होता असे सांगतात. म्हणजे 'चाय पे चर्चा' मग 'किसने किया खर्चा' असा प्रश्न निर्माण होतो. अशा सर्व व्यवहारांबाबत राजकीय पक्षांनी पारदर्शक व्यवहार केले पाहिजेत. त्यांचे खर्च आणि उत्पन्न त्यांनी लोकांना प्रामाणिकपणे सांगितले पाहिजेत. हेलिकॉप्टर्स, विमाने भाड्याने घेतात, ज्याचा खर्चाचा तपशील लोकांना कळला तर मोदी आणि त्यांच्या पक्षाविषयी लोकांच्या मनात अधिक विश्वास निर्माण होईल.  परंतु तसे ते आणि त्यांचा पक्ष करू शकत नाही. कारण सध्याची निवडणूक पध्दती आणि राजकारणातला आर्थिक व्यवहारच तशा स्वरूपाचा झाला आहे. मोदी सर्व प्रकारच्या सुधारणांच्या विकासाच्या वल्गना करतात. पण स्वत:च्या पक्षाच्या आर्थिक व्यवहारांच्या पारदर्शकतेविषयी काही बोलत नाहीत किंवा आपण सत्तेत आल्यानंतर भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणारी निवडणूक पध्दती बदलू असेही म्हणत नाही. म्हणूनच आपला सभ्यपणा जपण्याकरीता ते अनेक ठिकाणी समजून उमजून तडजोड करतात. युधिष्ठिरासारखेच अगदी द्रौपदीच्या वस्त्रहरणाप्रमाणे आज लोकशाहीचे वस्त्रहरण होत असताना मोदीदेखील सोयीस्कर मौन धारण करून आहेत.